***मंत्रिमंडळ निर्णय** : ३० वैशाख, १९३३, शके (सायं ५.३० वा.)
दिनांक : २० मे, २०११

मुंबई, दि. २० : मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले.

## धुळे जिल्ह्यातील १५० मेगावॅट क्षमतेच्या महासौर प्रकल्पास राज्य शासनाची मंजुरी

धुळे जिल्ह्यातील मौजे शिवाजीनगर येथे उभारण्यात येत असलेल्या एकूण १५० मेगावॅट क्षमतेच्या महानिर्मिती कंपनीच्या महासौर प्रकल्पास आज राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. तसेच या प्रकल्प उभारणीस व चंद्रपूर येथील सध्या कार्यरत १ मेगावॅट प्रकल्प व ४ मेगावॅट विस्तारित प्रकल्प क्षमतेचा सौर प्रकल्प या सर्व प्रकल्पांसाठी येणाऱ्या एकूण रु. १९८७ कोटी खर्चापोटी २० टक्के शासनाचे भागभांडवल रु. ३९७.४० कोटी गुंतवणूकीस देखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

शिवाजी नगर, ता.साक्री, जि.धुळे येथील सौर फोटोव्होल्टाईक प्रकल्प हा एकाच ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या इतक्या मोठ्या क्षमतेचा जगातील पहिलाच सौर ऊर्जा प्रकल्प आहे. या प्रकल्पास उर्वरित वित्तीय पुरवठा मे. के.एफ.डब्ल्यू. या जर्मन वित्तीय संस्थेकडून होणार आहे. लवकरच या बाबतीत इंडो-जर्मन करारनामा केला जाणार आहे. या १५० मेगावॅट (१२५+२५ मेगावॅट) क्षमतेपैकी १०० मेगावॅट क्रिस्टलाईन तंत्रज्ञानावर आधारित व ५० मेगावॅट थिन फिल्म तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे. या प्रकल्पातून तयार होणारी वीज ही राज्य वीज नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या दरानुसार महावितरणला पुरविण्यासाठी करार करण्यात आला आहे. तसेच मुंबईच्या बी.ई.एस.टी. वितरण कंपनीशीही करारनामा करण्यात आला आहे.

कोळशाचे मर्यादित साठे, जलविद्युत निर्मितीस असलेल्या भौगोलिक मर्यादा तसेच पर्यावरण संरक्षणासाठी पर्यायी व अक्षय ऊर्जा स्त्रोत विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सौर ऊर्जा निर्मितीस अधिकाधिक प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतलेली आहे. ही भूमिका जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशनशी सुसंगत आहे.

धुळे जिल्ह्यातील शिवाजीनगर येथील सौर प्रकल्पाचे काम लवकरच सुरु होणार असून दि. ३१ मार्च २०१२ पूर्वी हा प्रकल्प कार्यान्वित केला जाणार आहे.

०००० 

## देवोळे गावातील ६५ घरांचे खास बाब म्हणून स्वेच्छा पुनर्वसन करण्याचा निर्णय

रत्नागिरी जिल्ह्यातील कोंडवाडी (गडगडी) लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या बूडीत क्षेत्राबाहेर येणाऱ्या देवोळे गावातील ५६ व धनगरवाडा येथील ९ अशा एकूण ६५ घरांचे खास बाब म्हणून स्वेच्छा पुनर्वसन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने आज घेतला. या कामासाठी एक कोटी ७६ लाख रुपये इतका खर्च येणार असून हा खर्च जलसंपदा विभाग करणार आहे.

. . २/-

या गावाची भौगोलिक परिस्थिती पहाता घळभरणीनंतर या गावाचा वाहतूक मार्ग बंद होणार आहे. तसेच गावाच्या तीन बाजूला पाणी व एका बाजूला सह्याद्री पर्वत यामुळे गावाची कोंडी होणार आहे. यामुळे देवोळे गावाचे खास बाब म्हणून पुनर्वसन करण्याची मागणी करण्यात येत होती.

० ० ० ०

## नागपूर सुधार प्रन्यासच्या अधिनियमात सुधारणा

नागपूर सुधार प्रन्यास (Nagpur Improvement Trust) या क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिनियमात काही महत्वपूर्ण सुधारणा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला.

नागपूर सुधार प्रन्यासची स्थापना १९३६ च्या अधिनियमानुसार करण्यात आली आहे. प्रन्यासाच्या कामात सुधारणा घडवून ते अधिक गतीमान करण्यासाठी काही कालानुरुप बदलांची आवश्यकता होती. त्यानुसार हे बदल करण्यात आले आहेत.

- - - - -

- जिल्हाधिकारी, नागपूर किंवा अतिरिक्त / अपर जिल्हाधिकारी, नागपूर यांना प्रन्यासच्या विश्वस्त मंडळावर पदसिद्ध सदस्य म्हणून नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे.
- प्रन्यासाने निर्माण केलेल्या कोणत्याही पदावर पदसंख्या व त्या पदाचे वेतन याबाबत शासन निर्देश देऊ शकेल, अशी तरतूद करण्यात आली आहे.
- सहायक अभियंता आणि त्यापेक्षा कमी दर्जाच्या पदांबाबत नियुक्ती, पदोन्नती, रजा व अन्य अधिकार सभापतींना आणि त्यापेक्षा उच्च पदांविषयीचे अधिकार प्रन्यासला राहतील.
- प्रन्यासच्या आस्थापनेवर शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिकाऱ्याला प्रन्यासने रुजू करुन घेणे अनिवार्य राहील.
- राज्य शासन वेळोवेळी प्रन्यासला वित्तीय बाबी, कार्यावली आणि कामकाजासंबंधी निर्देश देऊ शकेल, हे निर्देश बंधनकारक राहतील.
- प्रन्यासाने केलेली कोणतीही कृती अथवा ठराव अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन करणारा, निधीचा गैरवापर किंवा अपव्यय करणारा आणि लोकहिताच्या विरोधात असेल तर तो रद्द करण्याचा अधिकार शासनाला राहील.
- कामाच्या संविदा करण्याबाबत सभापतींचे अधिकार रुपये एक हजारांवरुन पन्नास लाख रुपये करण्यात आले आहेत.
- जमिनीचे भाडे व उपकराची वसूल न होणारी रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याचे अधिकार सभापतींना देण्यात आले आहेत.

० ० ० ० ०